# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. १०
# सभा क्र. १३, दिनांक ३/६/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (साप्ताहिक) सभा शुक्रवार, दिनांक ३/६/२०२२ रोजी, सायंकाळी ५.०० (पाच) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन,पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

<u>माहितीसाठी आलेले विषय</u>

**विषय क्र. २१४**

दि. ०२/५/२०२२ ते दि. ८/५/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ८२ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/१२२, दि. २५/५/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. २१५**

दि. ०९/५/२०२२ ते दि. १५/५/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/१३१, दि. ३०/५/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. २१६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. २, कार्यालय अधिनस्त असलेल्या औंध–बाणेर क्षेत्रिय , शिवाजीनगर–घोले रोड व कोथरूड – बावधन कार्यालयाकडील कामांच्या दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३०/४/२०२२ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/१४०, दि. ०१/०६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

<u>सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स</u>

**विषय क्र. २१७**

चतुर्श्रुंगी पाणी पुरवठा विभागा अंतर्गत मोहननगर परिसर, दसरा चौक परिसर व इतर भागात टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. स्वामी समर्थ वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ४९,९९,५५५/– पेक्षा २०.७७% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,६०,७९७=४५ पर्यंत काम करून घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा. क्र मआ/पापु /१३६, दि. १/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २१८**

कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या ऊरूळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकर ने पाणीपुरवठा करणे (२०२१–२२ ) (भाग–४) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (पु.ग.प. र.रु. ९९,९१,८००/– पेक्षा ३.९९६% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९५,९२,५२७=६७ पर्यंत काम करून घेण्यासाठी त्यांचाशी करारनामा करणेस व दि. ०९/०४/२०२२ पासून काम सुरू करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा. क्र. मआ/पापु /१३७, दि. १/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २१९**

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभागा मध्ये टँकरने पिण्याचे पाणीपुरवठा करणे सन २०२१–२२ (भाग–४) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार माधव वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ३९,९९,६००/– पेक्षा ०.६३०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,७४,४०२=५२ चे काम उपलब्ध रकमेपर्यंत करून घेणेसाठी त्यांचाशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा. क्र. मआ/पापु /१३८, दि. १/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २२०**

कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या व पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ट फुरसुंगी गावामध्ये दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे ( २०२१–२२ ) (भाग–५) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( पु.ग.प. र.रु. ९९,९३,४००/– पेक्षा ०.२२०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९९,७१,४१४=५२ पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस व दि. ०२/०४/२०२२ पासून काम सुरू करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु /१३९, दि. १/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २२१**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्त्यांपैकी पॅकेज क्र.६ अंतर्गत सुस, बाणेर, महाळुंगे–बाणेर हद्दीवरील १८ मी. डी.पी. रस्ता बाणेर स.नं. ५५ ते स.नं. १०३ पर्यंतचा रस्ता पीपीपी तत्वावर विकसित करणे कामी कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धुत इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. १३,४७,९१,७४१/– पेक्षा १०.००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु. १२,१३,१२, ५६६=९० पर्यंत डेव्हलपमेंट क्रेडीट नोटच्या मोबदल्यामध्ये काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रू. १,६१,७५,००९/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू. ३२,८०,२१३/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १,३२,४४९/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस पर्यंतचा खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/१४१, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २२२**

हडपसर प्रभाग क्र. २२ मधील मगरपट्टा रोड ते नाल्यापर्यंत, साडेसतरा नळी पाईप लाईन रोड २४ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे कामी कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आदर्श भारत एन्व्हायरो प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ४,३४,९६,२६३=२५ पेक्षा २२.५५ % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३,३६,८७,८५५=८९ अधिक जी.एस.टी. र.रू. ५२,१९,५५१=५९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू. ४,०४,८०१=२८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ७१,४५०/– पर्यंत अधिक लेबरसेस र. रू. ४,३४,९६२=६३ पर्यंत अधिक वर्कर इंश्युरन्स र.रू. २,१७,४८१=३२ अशी एकूण र.रू. ४,००,३६,१०२=७१ पर्यंत काम करून घेणेस व त्याचे बरोबर करार करणेस तसेच अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/१४९, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>संकीर्ण</u>

**विषय क्र. २२३**

दिनांक १० एप्रिल २०२२ रोजी लोकमत समूहामार्फत आयोजित मॅरेथॉन स्पर्धेकरिता झालेल्या खर्चापैकी पुणे महानगरपालिकेतर्फे र.रू. ३० लाख लोकमत मीडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना अदा करणेसाठी पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रीडा/१३३, दि. ३०/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २२४**

महाराष्ट्र शुश्रुषागृहे नोंदणी नियम २०२१ शासन अधिसुचनेची अंमलबजावणी करणेसाठी प्रस्तावात दुरूस्ती करून मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या संदर्भ क्र. ३व ४ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेमधील मुद्दा क्र. ३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत बदल करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे सुधारीत दुरूस्ती प्रस्तावात खालील प्रमाणे दुरूस्ती करून व सदरच्या सुधारीत दुरूस्ती प्रस्तावास खालील बाबींस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१३४, दि. ३०/५/२०२२ चे पत्र.

१. मा. स्थायी समिती ठराव क्र. २५७९, दि. २९/३/२०२२ व मा. मुख्य सभा ठराव क्र. १०, दि. ११/०४/२०२२ मधील मुद्दा क्र. १,२,४,५,६,७ कायम ठेवणेस.

२. मा. स्थायी समिती ठराव क्र. २५७९, दि. २९/३/२०२२ व मा. मुख्य सभा ठराव क्र. १०, दि. ११/०४/२०२२ मधील मुद्दा क्र. ३ मध्ये अधिसुचनेनुसार वार्षिक परवाना शुल्क/फी आकारणी १ ते ५ खाटांसाठी रक्कम रू. ५०००/– व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्प्यासाठी रक्कम रू. ५०००/– प्रति ५ खाटा प्रमाणे वाढीव शुल्क आकारणेस **ऐवजी**

**खालीलप्रमाणे सुधारीत दुरूस्ती करणेस**

<u>**अधिसुचनेनुसार नुतनीकरण/नोंदणीचे तीन वर्षाकरिताची परवाना शुल्क/फी आकारणी १ ते ५ खाटांसाठी रक्कम रू. ५०००/– व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्प्यासाठी रक्कम रू. ५०००/– प्रति ५ खाटा प्रमाणे वाढीव शुल्क आकारणेस**</u>.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २२५**

पुणे पेठ कोंढवा बु. स.नं. ६६/१/६ नाना–नानी पार्क शेजारी अस्तित्वातील ६.०० मी रूंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१) (ब) अन्वये ९.०० मी. रूंदीची रस्ताप्रमाणरेषा कायम करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३५, दि. ३०/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**स्वाक्षरी/– xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दिनांक १९/८/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/– xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**